नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/12/2022 (शनिवार) सकाळ

---

## अधिसुचना

### दिनांक ११/१२/२०२२ रोजी अति महत्वाचे व्यक्ती यांचा नागपूर शहर येथे दौरा कार्यक्रम असल्याने सर्व प्रकारची जड वाहन व लोकल ट्रक वाहतुकीच्या व रहदारीचे नियमनाबाबत

विशाल आनंद (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांचे असे निदर्शनास आले आहे की, दिनांक ११/१२/२०२२ रोजी अति महत्त्वाचे व्यक्ती यांचा नागपूर शहर येथे दौरा कार्यक्रम आयोजित आहे. आगमन प्रसंगी मान्यवरांचे आयोजित आवागमनाचे संपूर्ण मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन नागपूर जिल्हा ग्रामीण वाहतूक पोलीसांकडुन वाहतूकीचे दृष्टीने विविध ठिकाणी बॅरीकेडींग करून दिनांक ११/१२/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. ते दुपारी ०२.०० वा. पर्यंत सर्व प्रकारची जड वाहन व लोकल ट्रक वाहतूक तात्पूरती थांबविण्याची आवश्यकता आहे.

त्या अर्थी, मुंबई पोलीस अधिनियम कलम ३३ पोट कलम २(१) तसेच गृह विभाग क्र. एम. व्हि. ए. –०५८९/सी.आर–१०६१/टि.आर./ए–२, दिनांक १९.०५.१९९० अन्वये व ११५ मोटर वाहन कायदा १९९८ अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ आणि ४३ वरील चंद्रपूर रोड कडून तसेच वर्धा रोड कडून ग्रामीण हद्दीपर्यंत येणारी सर्व प्रकारची जड वाहन व लोकल ट्रक दिनांक ११/१२/२०२२ चे सकाळी ०८.०० वा. ते दुपारी २.०० वा. पर्यंत वाहतूकी करीता बंद करण्यात येत आहे.

सदर अधिसुचना ही आज दिनांक १०/१२/२०२२ रोजी वरील प्रमाणे अति महत्वाचे व्यक्ती यांचा दौरा कार्यक्रम दिवशी वर नमुद वेळे दरम्यान जड वाहन व लोकल ट्रक वाहतूक तात्पुरती बंद करण्याबाबत सदर अधिसुचना पत्र जा. क्र. १५११ दि. १०/१२/२०२२ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

# फसवणुक

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावर मौजा खात येथे दिनांक २७/०७/२०२२ चे १३.४४ ते दिनांक २५/०८/२२ चे १४.०० वा दरम्यान फिर्यादी नामे— दुलेसिंग सदुसिंग मेंढे, वय ६० वर्षे, रा. खात हा के. वाय. सी. व शेतीचे इन्शुरन्स करण्याकरीता तसेच दुकानाचे गोमास्ता बनविण्याकरीता त्याचे समु ऑनलाईन झोन मध्ये गेला असता आरोपी नामे— प्रसिक प्रेमदास पटले, वय २२ वर्षे, रा. खात याने फिर्यादीचे पासबुक आणि आधारकार्ड मागितले व नंतर ''मी के. वाय. सी. व ईतर कामे अपडेट करून देतो'' असे म्हणुन फिर्यादीचे अकाउंट मधुन वारंवार पैसे काढुन अशी एकुण ५४३५०/—रू. ची ऑनलाईन फसवणुक केली

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादवि. सहकलम ६६ सी. डी. आय. टी. ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव मो. नं. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**